पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
माहिती व तंत्रज्ञान विभाग
क्र.मातंवि/ ८ /कावि/ ३६९/२०१७
दिनांक- १० / २ /२०१७

विषय:- महापालिका संकेतस्थळावर माहिती प्रसिद्ध / अद्ययावत करणेबाबत...

संदर्भ:- १) परिपत्रक क्र. मातंवि/१३/कावि/१६/२०१६, दि. १३/०१/२०१६
२) परिपत्रक क्र. मातंवि/१३/कावि/७७/२०१६, दि. ०१/०४/२०१६

परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका संकेतस्थळावर विविध विभागांशी संबंधित माहिती प्रसिद्ध करणेत येते. सदरची माहिती प्रत्येक विभागाने वेळोवेळी अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. १ व २ अन्वये विविध विभागांशी संबंधित (उदा. परिपत्रके, आदेश, निविदा, कोटेशन, नागरिकांची सनद, विविध योजना, विभागांची माहितीअंतर्गत येणारी माहिती, नागरिकांना देणेत येणा-या सेवा, **RTI** अंतर्गत प्रसिद्ध करावयाची माहिती इ.) माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर अद्ययावत ठेवणेबाबत कळविणेत आलेले असुन देखील अद्याप काही विभाग सदरची माहिती तसेच माहितीतील झालेले बदल संकेतस्थळावर प्रसिद्ध करीत नसल्याचे दिसुन येत आहे.

तरी आपले विभागाशी संबंधित माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे व ती वेळोवेळी अद्ययावत करणेबाबत दक्षता घेणेत यावी. याबाबत यापुर्वीच सर्व संबंधित विभागांना त्यांची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे व अद्ययावत करणेचे अधिकार (**Login ID** व **Password**) देणेत आलेले आहेत. तरी उपरोक्त माहिती प्रसिद्ध करणेबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झालेस माहिती व तंत्रज्ञान विभागाशी संपर्क साधावा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका वेबसाईटवरील माहिती मुदतीत संकेतस्थळावर प्रसिद्ध / अद्ययावत झाली नाही तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विभागप्रमुखांची राहील याची नोंद घेणेत यावी.

अतिरिक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.